


मा.मुख्य मंत्री महाराष्ट्र राज्य यांचे संकल्पनेतून
महाराष्ट्र शासनाचा
१०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रम

# महिला सक्षमीकरण लोकचळवळ एक पाऊल
# “ माझी लक्ष्मी, माझ्या ७/१२ उता-यावर"


## नाविन्यपूर्ण उपक्रम


**श्रीमती.शामला खोत-पाटील**
**तहसिलदार शिराळा, जि.सांगली.**


महाराष्ट्र शासन
तहसीलदार व तालुका कार्यकारी दंडाधिकारी शिराळा यांचे कार्यालय






तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार



# पार्श्वभूमी

महाराष्ट्र शासनाचा १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेकडून जिल्हातील सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सात कलमी कार्यक्रमापैकी, महाराष्ट्र शासनाकडीत परिपत्रक क्रमांक एस-१४/२१६८१६/प्र.क्र.४५८/९-६ दिनांक १५ सप्टेंबर १९९२ अन्वये “लक्ष्मी मुक्ती योजना” याची प्रभावी अंमलबजावणी करणेचे सूचित केले होते.

महाराष्ट्र शासनाची सदर योजना महिलांना मूलभूत अधिकार देणेसाठी अत्यंत उपयुक्त अशी आहे , तथापि ही योजना सन १९९२ ची असून, ती कालबाह्य असलेने , सामान्य नागरीकांमध्ये त्याची पुरेशी माहिती नव्हती. या योजनेचा  प्रभावी प्रसार- प्रचार न झालेने योजनेचा मुलभूत उद्देश सफल होऊ शकलेला नव्हता. मात्र शिराळा तालुका महसूल प्रशासनाने नारी शक्ती सन्मानार्थ ही योजना सर्व सामान्य नागरीकापर्यंत पोहचवून, जास्तीत महिलांना त्यांचे पतीचे बरोबरीने ७/१२ या मिळकत पत्रिकेवर नाव दाखल करुन ख-या अर्थाने महिला सक्षमीकरणाकरीता एक पाऊल टाकणेचा आव्हानात्मक प्रयत्न करणेचे धोरण स्वीकारले.

# कृती आराखडा

शिराळा तालुका हा सांगली जिल्हाचे पश्चिम भागांत असून, तालुक्याचा ६०-७० % भाग हा नेहमीच दुष्काळ सदृष्य व डोंगराळ प्रदेश असलेने, शेती हा व्यवसाय बारमाही होत नाही. नियमित रोजगारा अभावी तालुकेतील बहुतांश नागरीक मुंबई – पुणे या सारख्या मोठया शहराच्या ठीकाणी रोजगारानिमीत्त वास्तंव्यास आहेत. त्यामुळे योजनेचा योग्य तो प्रसार –प्रचार करुन योजनेची उपयुक्तता सर्व नागरीकांपर्यंत पोहचवून, सर्वांना या योजनेच्या चळवळीमध्ये सहभागी करुन घेणे आव्हानात्मक होते. महसूल प्रशासनातील कार्यालयीन अधिकारी –कर्मचारी , क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांचेसह , ग्रामस्तरांवरील स्थानिक अधिकारी –कर्मचारी जसे ग्राम पंचायत अधिकारी , पोलीस पाटील , अंगणवाडी सेविका , आशा वर्कर यांचा सक्रीय सहभाग प्रथम आवश्यक होता.

त्याच बरोबर या योजनेस लोकसहभागांत रुपांतरण करणेसाठी लोप्रतिनधी, आजी - माजी सरपंच , ग्रामपंचायत सदस्य , विकास सोसायटीचे पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरीक, सामाजिक क्षेत्रामध्ये काम करणारे कार्यकर्ते या सर्व घटकांना विश्वासात घेऊन सर्व सामान्य नागरीकांपर्यंत योजना पोहचविणेचे कार्य करणे आवश्यक होते.

याकरिता मा.उपविभागीय अधिकारी वाळवा विभाग इस्लामपूर यांचे मार्गदर्शनाखाली योग्य नियोजन, कार्यपध्दती व कृती आराखडा तयार करणे व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी शिराळा तालुका महसूल प्रशासनांमार्फत पुढील प्रमाणे करणेत आली आहे.

# कृती आराखडा

१. तालुकेतील सर्व गावचे आजी – माजी सरपंच, जिल्हा परीषद - पंचायत समितीचे पदाधिकारी , विकास सोसायटीचे पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरीक सामाजिक क्षेत्रांत काम करणारे कार्यकर्ते , सर्व शासकीय विभागाचे क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांची संयुक्त बैठक दि.      /०१/२०२५ रोजी तहसिल कार्यालयाचे सभागृहात घेणेत येऊन, या योजनेची उपयुक्तता स्पष्ट करणेत आली . त्याच बरोबर या  योजनेची माहिती सर्व सामान्य नागरीकापर्यंत आपले मार्फत पोहचवून , संबधित लोकप्रतिनिधी यांना प्रथम या योजनेत सक्रीय सहभागी होणेचे आवाहन करणेत आले.

२. तहसिल कार्यालयांमध्ये  या योजनेचा अंमलबजावणी करीता, महसूल नायब तहसिलदार , सहा. महसूल अधिकारी व महसूल सहायक यांचा  स्वतंत्र  कक्ष स्थापन करणेत आला.

३. तालुकेतील  मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी व महसूल सेवक यांचे मार्फत प्रथम प्रत्येक महसूल गावनिहाय  वैयक्तीक पुरुष खातेदार यांची यादी  तयार करणेत आली.

# योजना अंमलबजावणी संवाद व नियोजन बैठक





तहसिलदार शिराळा, यांचे कार्यालय
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत ता. शिराळा
फोन नं. 02345/272127 ई - मेल - shiralatahsil@gmail.com

वाचले क्र. 1) शासन परिपत्रक क्र. एस-14/2161816/पु.क्र.458/ल-6 दिनांक 15 सप्टेंबर 1992
2) मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेकडील परिपत्रक क्र.मह.-३/ह.नो./आरआर/७३/२०२५ दि.२७/०१/२०२५

क्र./हनों/कावि/ल.मु.यो./एसआर / 175/25 — दि. 29 /01/2025

**परिपत्रक**

वरील वाचले क्रं. २ अन्वये मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेकडून, महाराष्ट्र शासनाकडील परिपत्रक क्रमांक एस १४/२१६८१६/प्र.क्र.४५८/९-६ दिनांक १५ सप्टेंबर १९९२ अन्वये "लक्ष्मी मुक्ती योजना" ची तालुका व गावस्तरावर मोठ्या प्रमाणाव प्रसिध्दी देण्यात यावी तसेच विषयांकित विनंतीबाबत अर्ज प्राप्त झालेवर सदर अर्जावर महाराष्ट्र महसुल अधिनियम, १९६६ मधील कलमांच्या तरतुदीनुसार तात्काळ कार्यवाही करणेत यावी. प्राप्त होणारे अर्ज, अंतिमतः केलेली कार्यवाही व गाव नमुना नं. ७/१ सदरी पुरुषाबरोबर स्त्रीयांच्या मालकी हक्काची नोंद केलेबाबतच्या प्रकरणांची माहीती तालुका स्तरावर जतन करून ठेवणे आदेशित केले आहे.

त्यानुसार शिराळा तालुक्यामध्ये "लक्ष्मी मुक्ती योजना"ची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत वेळोवेळी मंडळ अधिकारी ग्राम महसूल अधिकारी यांना प्रत्येक मंडळातील सर्व महसूल गावांमधून किमान १००० (एक हजार ) चे उद्दिष्ट ठरवून दिलेले आहे सदर उद्दिष्ट साध्य करणेसाठी मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांनी खालील प्रमाणे कृती व कार्यवाही करणेची दक्षता घ्यावी.

१. मंडळ कार्यक्षेत्रामधील प्रत्येक महसूल गावांमधील सर्व खातेदारांना या योजनेची माहिती होणेकरीता, महसूल सेवक व ग्रामपंचाय मार्फत जाहिर सूचना / दवंडी देऊन मोठया प्रमाणांत प्रचार- प्रसिध्दी करणेत यावी.
२. मंडळ अधिकारी यांनी आपले कार्यक्षेत्रातील प्रत्येक महसूल गावांकरीता एक दिवस निश्चित करुन, मेळावा आयोजित केले कार्यक्रम किमान सात दिवस अगोदर जाहिर करुन, त्याची प्रत या कार्यालयांस आजच सादर करावी. त्यापूर्वी संबधित गावचे ग्रा महसूल अधिकारी यांनी सदर योजनेचा विहीत नमूना अर्ज, नमुना प्रतिज्ञापत्र, संमतीपूर्वक जबाब प्रत, ७/१२, खाते उतारा, तसे नजीकचे महाईसेवा केंद्र / सेतू केंद्र इ. सुविधा नागरीकांना उपलब्ध करुन द्यावी. मंडळ अधिकारी यांनी नियोजित केलेल्या मेळावा दिनांकास नागरिकांकडून अर्ज व त्या संबधित आवश्यक कागदपत्रे स्वीकारुन, त्याच दिवशी मंडळ अधिकारी यांनी प्रा अर्जाची स्थानिक चौकशी करुन, प्रस्तावातील मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयांत दावा सुरु अगर प्रलंबित नाही या खात्रीकरावी, तसेच अर्जदार यांची एकमेव कायदेशीर पत्नी असलेबाबत पडताळणी करणेत येऊन, सदरचा प्रस्ताव मान्य करणे यावा अगर कसे याबाबत प्रकरण निहाय स्वयंस्पष्ट अभिप्राय व शिफारसीसह परीपूर्ण प्रस्ताव तयार करणेत यावेत.
३. परीपूर्ण प्रस्तावाची विहीत नमुन्यातील इक्सेल शीटमधील सॉफ्ट कॉपी मधील माहितीसह मंडळ अधिकारी / संबधित ग्राम महसू अधिकारी यांनी समक्ष तहसिल कार्यालयांत उपस्थित राहून त्याच दिवशी आदेश प्राप्त करुन घेणेत यावेत. आदेशानुसार तय करणेत येणा-या फेरफारामध्ये सविस्तर तपशिल नमूद करुन तात्काळ ७/१२ पत्रकी अंमल देणेत यावा.
४. पूर्वीचा ७/१२, व अंमल दिलेनंतरचा दुरुस्त ७/१२, फेरफारची एक प्रत तहसिल कार्यालयात हक्कनोंद संकलनाकडे जमा करणे यावी दुसरी प्रत संबधित नागरीकांना वाटप केलेबाबतचे फोटोची प्रतही सादर करणेत यावी.

(शामला खोत-पाटील)
तहसिलदार शिराळा

प्रति,
सर्व मंडळ अधिकारी / ग्राम महसूल अधिकारी ता.शिराळा जि.सांगली.
प्रत - मा.जिल्हाधिकारी सांगली(कुळवहीवाट शाखा ) यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत- मा.उपविभागीय अधिकारी वाळवा उपविभाग इस्लामपूर यांना माहितीसाठी सविनय सादर.

# कृती आराखडा

४. मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांना या योजनेची मोहिम स्वरुपांत अंमलबजावणी करणेकरीता प्रत्येक आठवडयामध्ये एका महसूल गावांतध्ये मेळावा – शिबीर आयोजित करणेचा कृती कार्यक्रम आखून देणेत आला. त्यानुसार प्रत्येक महसूल गावातून किमान १० लाभार्थी हे उदिष्ट ठरवून देणेत आले. या करीता वरीलप्रमाणे तयार करणेत आलेल्या पुरुष खातेदार यांचे यादीतील किमान २० खातेदारांना दैंनदिन सर्व त्या मार्गाने संपर्क साधणेचे सूचित करणेत आले.

५. तहसिल कार्यालयातील तहसिलदार यांचेसह , सर्व शाखामधील अधिकारी व कर्मचारी यांचे मार्फत , शासकीय कामानिमित्त कार्यालयांत येणा-या प्रतिष्ठीत नागरीक, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते यांना या योजनेची माहिती देऊन या योजनेत सक्रीय सहभागी होणेकरीता प्रवृत्त करणेची जबाबदारी सोपविणेत आली.

६. प्रत्येक मंडळ स्तरांवर होणा-या मेळावामध्ये मा.उपविभागीय अधिकारी वाळवा विभाग इस्लामपूर , तहसिलदार , नायब तहसिलदार यांचे भेटीचा कार्यक्रम निश्चित करणेत येऊन , त्यानुसार अंमलबजावणी करणेत आली.

## मंडळ स्तरावरील मेळावा

## मा.उपविभागीय अधिकारी , तहसिलदार , नायब तहसिलदार यांची उपस्थिती



पुण्यनगरी

# 'माझी लक्ष्मी माझ्यासोबत...' योजनेत नाव नोंदवा

## प्रांताधिकारी श्रीनिवास अर्जुन यांचे आवाहन

**बांबवडे / वार्ताहर**

शेतकऱ्याला आपल्या पत्नीचे नाव सातबारावर हिस्सेदार म्हणून नोंद करण्यासाठी शासनाने माझी लक्ष्मी माझ्यासोबत माझ्या सातबारावर या योजनेत सहभाग घेऊन नाव नोंदवावे, असे आवाहन प्रांताधिकारी श्रीनिवास अर्जुन यांनी केले.

बांबवडे येथे लक्ष्मी मुक्ती योजना अंतर्गत परिसंवाद कार्यक्रम बोलत होते. यावेळी तहसीलदार शामला खोत-पाटील, पुरवठा अधिकारी शारदा रेळे, मंडल अधिकारी सोनाली यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अंगणवाडी व जिल्हा परिषद शाळेची पाहणी व विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासण्यात आली तसेच शाळाची समस्या जाणून घेतली. गावच्या पूर्वेला असलेला शिवकालीन पन्हाळा ते सातारा मुख्य पाणंद रस्त्याता बंद असून रोजगार हमीतून दुरूस्तीला मंजूरी देऊन उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी सरपंच भिमराव ताटे, उपसरपंच दौलत जाधव, संचालक विश्वास पाटील, संचालक सुकमार पाटील, पोलीस पाटील धनंजय माने, ग्रामसेवक सचिन भिसे, ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत हिंगणे, दिलीप हिंगणे, बाळकृष्ण बनसोडे, सुरेश मोरे, मंगल झेंडे, रेश्मा खोपडे व नागरिक उपस्थित होते.

**बांबवडे : येथे लक्ष्मी मुक्ती योजना परिसंवाद कार्यक्रम बोलताना प्रांत अधिकारी श्रीनिवास अर्जुन. समवेत तहसीलदार शामला खोत पाटील, सोनाली गायकवाड, भिमराव ताटे, दौलत जाधव आदी.**

Sangli Edition
Feb 17, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com






मंडळ स्तरावरील मेळावा
मा.उपविभागीय अधिकारी , तहसिलदार , नायब तहसिलदार यांची उपस्थिती







# कृती आराखडा

७. नियोजित मेळाव्याचे किमान सात दिवस अगोदार , या योजनेसाठी आवयश्यक असणारी कागदपत्रे , प्रतिज्ञापत्र, अर्जाचा नमुना इ. यासह आवश्यकती सर्व माहिति तलाठी कार्यालयांत उपलब्ध ठेवणेत आली. मेळाव्याचे ठिकाणी मंडळ अधिकरी , ग्राम महसूल अधिकारी , ग्रामपंचायत अधिकारी , पोलीस पाटील , अंगणवाडी सेविका व महा ई सेवा केंद्र चालक इ. आवश्यक ती सर्व प्रशासकीय यंत्रणा उपलब्ध ठेवणेत आली.

८. मेळाव्यामध्ये प्राप्त होणा-या प्रस्ताव त्यच दिवशी तहसिल कार्यालयातील कक्षामध्ये स्वीकारणे व त्याची छाणनी करुन , आदेश तयार करणे, तहसिलदार यांची स्वाक्षरी घेऊन आदेशाची प्रत अर्जदार व ग्राम महसूल अधिकारी यांना तात्काळ पुढील कार्यवही साठी अग्रेषित करणे.

९. आदेशानुसार ग्राम महसूल अधिकारी यांनी तात्काळ फेरफार तयार करणे, मंडळ अधिकारी यांनी फेरफार नोंद प्रमाणित करुन , दुरुस्त व अद्यावत ७/१२ संबधित महिला लाभार्थी यांना तात्काळ वाटप करणे.

# फलनिष्पत्ती

**“ माझी लक्ष्मी, माझ्या ७/१२ उता-यावर“**
13/01/2025 ते 20/03/2025

| अ. क्र. | मंडळाचे नांव | नेमूण दिलेले उद्दीष्ट (७/१२ संख्या) | प्राप्त अर्जांची संख्या | तहसिलदार यांनी मंजूर केलेले प्रस्ताव संख्या | तहसिल कार्यालयांत प्रलंबित प्रस्ताव संख्या | महिलांचे नाव दाखल केलेल्या ७/१२ ची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | शिराळा | 100 | 15 | 15 | 0 | 22 | |
| 2 | शिरसी | 100 | 207 | 207 | 0 | 518 | |
| 3 | कोकरुड | 100 | 33 | 33 | 0 | 212 | |
| 4 | चरण | 100 | 12 | 12 | 0 | 24 | |
| 5 | सागांव | 100 | 47 | 47 | 0 | 164 | |
| 6 | मांगले | 100 | 38 | 38 | 0 | 97 | |
| एकूण | | 600 | 352 | 352 | 0 | 1037 | |

# फलनिष्पत्ती

१. महिला सक्ष्मीकरण – शिराळा तालुकेतील अजपर्यंत एकूण ३५२ महिला खातेदारांना १०३७ सात-बारा उता-यावर त्यांचे नाव पतीबरोबर दाखल करुन, महिलांना त्यांच्या स्थावर मिळकतीधील मूलभूत अधिकार प्राप्त करुन देणेत आला आहे.

२. व्यसनाधीन घरकर्त्या पुरुषामुळे कुटुंबाची उपजिवकेचे एकमेव साधन असणारी शेतजमीनीची परस्पर विल्हेवाट लावलेमुळे त्या कुटुंबाची मोठया प्रमाणांत परवड झालेच्या अनेक घटना निदर्शनांस आल्या होत्या. या योजनेमुळे घरातील महिला ७/१२ पत्रकी सहिस्सेदार झालेमुळे , व्यसनाधीन पुरुष खातेदार यांना यापुढे पत्नीचे सहमतीशिवाय यापुढे मालमत्तेची विल्हेवाट लावता येणार नाही. यामुळे एक प्रकारे अशा कुटुंबाचे भवितव्याचे कायदेशीर संरक्षण झाले आहे.

३. घटस्फोटीत महिलांच्या बाबतीत, समाजातील परंपरागत रुढीमुळे त्यांना पतीकडील मालमत्तेतून बेदखल करणेत येते. आजही ग्रामीण भागामध्ये अशा महिलाचे भविष्यातील उदरनिर्वाहबाबत कोणताही विचार करणेत येत नाही.या योजनेचा लाभ मिळालेल्या महिलांना भविष्यांत अशा प्रसंगाना सामोरे जावे लागलेस अशा महिला व त्यांचेवर अवलंबून असणा-या मुलांना त्यांचे उपजिवीकेचे संरक्षण निर्माण होणार आहे.

४. अल्प काळात पतीचे निधनानंतर विधवा पत्नीस एकत्रीत कुटुंबातील इतर सदस्याकडून, कायदेशीर वारसाहक्काने मिळणा-या संपतीवरील हक्कांबाबत अनेक प्रकारे अडथळे निर्माण केले जातात. या योजनेमुळे अशा पिडीत महिलांना भविष्यांत यापुढे नाहक त्रासास सामोरे जाणेची आवश्यकता राहणार नाही.

# फलनिष्पत्ती

५. पश्चिम महाराष्ट्रा मध्ये सहकार चवळळ मोठया प्रमाणांत रुढ असून, सहकारी संस्था  ग्रमीण अर्थकारणाचा महत्वाचा केंद्र बिंदू आहेत.अशा संस्थामध्ये सक्षम महिला खातेदारांना ७/१२ पत्रकी नाव नमूद नसले कारणामुळे संधी उपलब्ध होत नव्हती. आता मात्र ७/१२ पत्रकी नाव दाखल झालेमुळे योग्य व सक्षम महिलांना सहकारी संस्थामध्ये प्रतिनिधीत्व करणेची संधी या योजनेमुळे प्रापत झाली आहे.

६. केंद्र शासन , राज्य शासन , नाबार्ड सारख्या सरकारी बँका मार्फत शेतकर-यांव्या उन्नतीसाठी असणा-या विविध योजनांचा लाभ या महिला खातेदारांना ७/१२ पत्रकी नाव दाखल झालेमुळे मिळणेस मदत होणार आहे. यामुळे एकंदरीच सक्षम महिलांचे माध्यमातून  ग्रामीण भागाचे विकास होणार आहे.


७. शिराळा तालुका महसूल प्रशासनांकडून महिला सक्ष्मीकरणांसठी टाकलेल्या पाऊलामुळे लाभार्थी महिलांच्या चेह-यावरील हास्य, आनंदाश्रू  व त्यांची कृतज्ञापूर्वक बोलकी  देहबोली बरेच काही सांगून जाते. नारी सन्मानार्थ घेतलेलेल परीश्रम व या उपक्रमाने घेतलेले लोकचळवळीचे स्वरुप  यापुढील लोकाभिमुख महसूल प्रशासनाच्या कार्यास उर्जा देणारे आहे.


**नारीशक्ती सन्मान – महिला सक्ष्मीकरण या उद्देशाची सफलता हीच खरी या उपक्रमाची**

**“फलनिष्पत्ती”**

# “ माझी लक्ष्मी, माझ्या ७/१२ उता-यावर योजना"

## पुर्वीचे व उपक्रमानंतरचे ७/१२ उतारे



(1)

**तहसिलदार शिराळा, यांचे कार्यालय**
**मध्यवर्ती प्रशासकीय इमारत ता. शिराळा**
**फोन नं. 02345/272127 ई - मेल** - shiralatahsil@gmail.com

वाचले क्र. 1) शासन परिपत्रक क्र. एस-14/2161816/पु.क्र.458/ल-6 दिनांक 15 सप्टेंबर 1992
2)अर्जदार महादेव महिपती कांबळे **रा. सागाव** ता. शिराळा यांचा अर्ज.
3)**मंडळ अधिकारी- सागाव** यांचा चौकशी अहवाल जा.र. नं. 20 /25 दि. 27-01-2025

क्र./हनों/कावि/ल.मु.यो./एसआर / 1 /25 दि. 27/01/2025

**आदेश**

ज्याअर्थी वाचले क्र.01 अन्वये अर्जदार **श्री.महादेव महिपती कांबळे रा.सागाव** ता. शिराळा जि. सांगली यांनी या कार्यालयाकडे लक्ष्मीमुक्ती योजनेतंर्गत त्यांच्या कायदेशीर पत्नीचे नांव 7/12 सदरी सहहिस्सेदार म्हणून दाखल होणेबाबत विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी वाचले क्र.03 अन्वये **मंडळ अधिकारी सागाव** यांचेकडून सविस्तर चौकशी अहवालान्वये अर्जदार यांची कायदेशीर पत्नीचे नाव दाखल करणेस हरकत नसलेचा अभिप्राय या कार्यालयास प्राप्त झाला आहे.


त्याअर्थी वाचले क्र.01 नुसार **मी शामला खोत-पाटील, तहसिलदार शिराळा,** खालील तपशिलात नमूद केलेप्रमाणे रकाना नं ३ मध्ये नमूद असलेल्या स.नं./ग.नं. चे ७/१२ सदरी रकाना नं. ५ मध्ये नाव नमूद असलेल्या अर्जदार यांच्या कायदेशीर पत्नीचे नाव सहहिस्सेदार म्हणून दाखल करणेबाबत आदेश करीत आहे.

| अ.नं. | गावाचे नांव | स.नं. / ग.नं. | खातेदाराचे नांव | कायदेशीर पत्नीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | सागाव | 360/1, 174/1, 174/4, 174/10, 206/1 ते 13 | महादेव महिपती कांबळे | राणी महादेव कांबळे |

**(शामला खोत-पाटील )**
**तहसिलदार शिराळा**

प्रत,

1) श्री.महादेव महिपती कांबळे रा. सागाव ता. शिराळा जि. सांगली यांना माहितीसाठी.
1) ग्राम महसूल अधिकारी ,-सागाव
२/- सदर आदेशानुसार तात्काळ ७/१२ पत्रकी अंमल देणेत येऊन दुरुस्त ७/१२ व खाते उतारा सादर करणेत यावा.



# “ माझी लक्ष्मी, माझ्या ७/१२ उता-यावर योजना"

## लाभार्थींना ७/१२ उतारा वाटप








# धन्यवाद.